SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in,
Other Exam- 2: PHONE :0231-2609120 oe2.exam@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416004, महाराष्ट्र
दूरध्वनी–ईपीएबीएक्स–2609000, www.unishivaji.ac.in,
इतर परीक्षा 2:फोन नं. 0231-2609120,9121,9473 oe2.exam@unishivaji.ac.in
Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

जा. क./शिवाजी. वि./इ.प2/3/ए.एस.जी./152 दि 01.11.2023

प्रति,

1) मा. विभागप्रमुख/संचालक/समन्वयक
एम.ए. पदव्युत्तर अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2) मा. प्राचार्य / मा.संचालक
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(इतर परीक्षा 2 विभागाशी संबंधित)

**विषय : ऑक्टो, 2023 प्रात्यक्षिक/प्रकल्प/मौखिक/टर्मवर्क परीक्षेबाबत.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय संदर्भात आदेशान्वये कळविण्यात येते की, शासन निर्देशानुसार इतर परीक्षा विभाग –2/3 विभागाशी निगडीत ऑक्टो./नोव्हे, 2023 च्या सर्व विद्यार्थ्यांच्या एम.ए सोशल सायन्स व लॅग्वेजस, तसेच इतर एम.ए. कोर्सेसच्या प्रात्यक्षिक/मौखिक/प्रकल्प इ. परीक्षा घेण्याबाबत विद्यापीठ अधिविभाग/संलग्नीत महाविद्यालयांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

खालील दिलेल्या तारखांप्रमाणे ज्यांच्या लेखी परीक्षा संपणार आहेत. त्यांनी त्यापूर्वी प्रात्यक्षिक/प्रकल्प/मौखिक/टर्मवर्क परीक्षेचे आयोजन करून सदर संगणक प्रणालीत गुण भरून त्यांचे गुणतक्ते इतर परीक्षा 2 विभागात जमा करावेत.

| लेखी परीक्षा संपणेचा दिनांक | प्रात्यक्षिक/प्रकल्प/मौखिक/टर्मवर्क गुण तक्ता जमा करण्याचा दिनांक | लेखी परीक्षा संपणेचा दिनांक | प्रात्यक्षिक/प्रकल्प/मौखिक/टर्मवर्क गुण तक्ता जमा करण्याचा दिनांक | लेखी परीक्षा संपणेचा दिनांक | प्रात्यक्षिक/प्रकल्प/मौखिक/टर्मवर्क गुण तक्ता जमा करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| दि. 09.11.2023 | दि. 20.11.2023 | दि. 25.11.2023 | दि.30.11.2023 | दि.20.12.2023 | दि.25.12.2023 |

1. प्रात्यक्षिक/मौखिक/प्रकल्प/टर्मवर्क – या परीक्षा महाविद्यालय व अधिविभागात होत आहेत. तरी लेखी परीक्षेच्या आधी विहीत मुदतीत सदर प्रक्रिया राबविण्यात यावी.
2. ज्या परीक्षेचे नियोजन परीक्षा विभागाकडून कळविणेत आलेले आहे. त्याप्रमाणे त्यांचे नियोजन करण्यात यावे.
3. ज्या परीक्षा अधिविभाग/महाविद्यालय स्तरावर आयोजित केल्या आहेत. त्यांचे नियोजन लेखी परीक्षेपूर्वी करावे जेणेकरून सदर परीक्षेचे निकाल जाहीर करताना सदर गुणांमुळे निकाल प्रलंबित राहू नये, याची दक्षता घेण्यात यावी.
4. **सदर परीक्षा झालेनंतर तातडीने सदर गुण विहीत वेळेत संगणक प्रणालीत भरण्यात यावेत. सिस्टिम मध्ये गुण भरताना अनुपस्थित विद्यार्थ्यांना अबसेंट असे भरावे व उपस्थित विद्यार्थ्यांचे गुण सिस्टीममध्ये भरण्यात यावेत. सदरप्रमाणे गुण भरून झालेनंतर सर्व सिस्टिममध्ये भरलेल्या गुणांची तपासणी करून त्यानंतर ते निश्चित (Confirm) करण्यात यावेत. कोणत्याही कारणास्तव विद्यार्थ्यांचे गुणदान करणे राहू नये, याची दक्षता आपल्या स्तरावर घेण्यात यावी.**
5. गुण भरण्यासाठी आवश्यक ती लिंक आय.टी. विभागाकडून उपलब्ध करून देण्यात येत असून, सदरचे गुणतक्ते इतर परीक्षा 2 विभागात जमा करण्यात यावेत. गुण तक्ते जमा करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, याची संबंधितांनी नोंद घ्यावी. गुणतक्ते जमा करताना संबंधितांनी ती चेक करून प्राचार्य/विभागप्रमुखांच्या सहीने सांक्षांकित करून जमा करावयाची आहे.
6. निकाल जाहीर झालेनंतर संगणक प्रणालीत गुण भरलेस, गुण प्रणालीमध्ये दिसून येतात. मात्र, निकालामध्ये सदरचे गुण दिसून येणार नाहीत. तरी सदर निकाल जाहीर होणेपूर्वी, दिलेल्या तारखेस गुण संगणक प्रणालीत भरणे आवश्यक आहे. **निकाल जाहीर केल्यानंतर गुण दिल्यास विद्यापीठ नियमाप्रमाणे दंडात्मक कार्यवाही होवू शकते, याची नोंद घ्यावी.**
7. ज्यांच्या लेखी परीक्षा डिसेंबर महिन्यात वरील दिलेल्या तारखा व्यतिरिक्त अद्यापही अजून पुढे होणार आहेत. त्यांनीही त्यांचे प्रात्यक्षिक/प्रकल्प/मौखिक/टर्मवर्क परीक्षेचे आयोजन परीक्षपूर्वी करून त्याचे गुणतक्ते लेखी परीक्षा झालेनंतर दोन –तीन दिवसांच्या आत इतर परीक्षा 2 विभागात जमा करावेत.
8. प्रात्यक्षिक/प्रकल्प/मौखिक/टर्मवर्क सर्व परीक्षेच्या तारखा सर्व विद्यार्थी, शिक्षक व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात.

कळावे.

आपला विश्वासू,

Sd/-
मा.संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत – 1. आय.टी. सेल – गुण भरण्याकरीता लिंक उपलब्ध करून देण्यात यावी.
2. परीक्षक नियुक्ती विभागास माहितीसाठी